**शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारिबाहेरील व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रम राबविण्यास मान्यता देण्याबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००६/(६६ /०६)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ४ जानेवारी, २००७.

**संदर्भ :-** १ . शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र जीईसी २०९७/(१३८/९७)/तांशि-१, दि. १९ ऑगस्ट, १९९८.
२. संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/नवीन संस्था अभ्यासक्रम प्रस्ताव/ २००६/३९२, दि. २ मे, २००६
३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/पदविका/२००६/३८३, दि.१८ ऑगस्ट,२००६

**शासन निर्णय :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारिबाहेरील व्यवस्थापनशास्त्रातील पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रम राबविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उपरोक्त संदर्भ-१ मधील शासन निर्णयास अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत संबंधित संस्थेची तपासणी करण्यात आली आहे व संचालनालयाने उपरोक्त संदर्भ-२ व ३ मधील पत्रान्वये केलेल्या शिफारशीनुसार **आर.सी.पटेल एज्युकेशन ट्रस्ट संचलीत इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट, शिरपूर, जि. धुळे** या संस्थेत सुरु असलेल्या एम.सीएम या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खालीलप्रमाणे बदल करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मुळ प्रवेशक्षमता | सुधारीत प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | एम.सी.एम | ३० | ६० |

निम्न निर्देशित अटी व शर्ती मान्य असल्यासंबंधी तथा अन्य औपचारिक बाबीसंबंधात मान्यताप्राप्त संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी करारनामा करणे बंधनकारक असून संचालक, तंत्रशिक्षण यांनी संबंधित संस्थांत आवश्यक शिक्षक वर्ग नियुक्त केल्याची व या संस्थांत ग्रंथालय तथा प्रयोगशाळा पूर्णपणे कार्यान्वीत झाल्याची खात्री करावी.

- शासनाने विहीत केलेल्या तसेच यापुढे विहीत करण्यात येणा-या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सदर अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावर राबविण्याचे ठरविल्यास या अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता घेणे आवश्यक राहील.
- सदर पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यापीठाची संलग्नता आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.गो. खडपकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये
३. कुलसचिव, उत्तर महाराष्टत्र विद्यापीठ, जळगाव
४. संबंधीत संस्था
५. निवड नस्ती, तांशि-६